नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५८ Issue - 258 | वार शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ Blow- Saturday Date 7 February 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## विश्वविजेता भारत!

### अंडर-१९; इंग्लंडचा धुव्वा उडवत भारताने सहाव्यांदा कोरलं विश्वचषकावर नाव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हरारेच्या मैदानावर भारताच्या अंडर-१९ संघाने इतिहासाची पुनरावृत्ती केली. आयसीसी पुरुष-१९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर तब्बल १०० धावांनी दणदणीत विजय साकारत सहाव्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले. वैभव सूर्यवंशीच्या विक्रमी आणि वादळी १७५ धावांच्या खेळीमुळे भारताने ४१२ धावांचा डोंगर उभा केला, ज्यापुढे इंग्लंडचा संघ पुरता कोसळला. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश फलंदाज अपयशी ठरले आणि संपूर्ण संघ ३१२ धावांत गारद झाला. या विजयासह भारताने सहाव्यांदा (२०००, २००८, २०१२, २०१८, २०२२ आणि २०२६) विश्वविजेतेपदाचा चषक उंचावून नवा इतिहास रचला आहे.

भारताच्या डावाची सुरुवात वैभव सूर्यवंशी आणि आरोन जॉर्ज यांनी केली. मात्र सुरुवातीलाच भारताला धक्का बसला. आरोन जॉर्ज अवघ्या ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार आयुष म्हात्रेने डाव सावरत जबाबदारीने खेळ केला. आयुषने ५१ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५३ धावांची महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी साकारली.

यानंतर भारताकडून वैभव सूर्यवंशीने अक्षरशः धुमाकूळ घातला. त्याने अवघ्या ३२ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले आणि ५५ चेंडूत शानदार शतक झळकावले. वैभवने फक्त ७१ चेंडूत १५० धावांचा टप्पा ओलांडत प्रेक्षकांना थक्क केले. अखेर त्याने ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकारांच्या मदतीने १७५ धावांची अफलातून खेळी केली. या डावात त्याचा स्ट्राईक रेट तब्बल २१८.७५ इतका होता.

वैभव बाद झाल्यानंतर भारतीय डावाचा वेग काहीसा मंदावला. त्यानंतर विहान मल्होत्राने ३६ चेंडूत २ चौकारांसह ३० धावा करत योगदान दिले. वेदांत त्रिवेदीनेही ३६ चेंडूत ३ चौकारांसह ३२ धावांची उपयुक्त खेळी केली. अभिज्ञान कुंडूने आक्रमक खेळ करत ३१ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ४० धावा केल्या. याशिवाय आर. एस. अंबरीशने १८, खिलेन पटेलने ३, हिनेल पटेलने ५ धावा केल्या, तर कनिष्क चौहान नाबाद ३७ धावांवर राहिला. इंग्लंडकडून जेम्स मिंटोने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. त्याला एलेक्स ग्रीन आणि सेबस्टियन मॉर्गन यांनी प्रत्येकी २ विकेट घेत चांगली साथ दिली.

४१२ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. भारताच्या भेदक गोलंदाजीसमोर इंग्लंडचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेले. इंग्लंड संघ ४०.२ षटकांत ३११ धावांवर गारद झाला. वैभव सूर्यवंशी हा टीम इंडियाचा अंतिम सामन्याचा स्टार होता, त्याने फक्त ८० चेंडूत १७५ धावा केल्या. दरम्यान, इंग्लंडकडून क्लेब फॉकनरने शतक झळकावले, परंतु तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. फॉकनरने ६७ चेंडूत ११५ धावा केल्या.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीचा धुरळा!

### राज्यातील १२ जिल्हापरिषदा, १२५ पंचायत समित्यांच्या कारभाऱ्यांसाठी आज मतदान



मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची रणधुमाळी आज रंगतेय. राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांच्या तारखेमध्ये बदल करण्यात आला होता. त्यानुसार ५ फेब्रुवार रोजी होणारे मतदान आज ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून ९ फेब्रुवारी करण्यात आलंय. या पार्श्वभूमीवर संबंधित सर्व यंत्रणा, पोलीस प्रशासन सज्ज झालं आहे.

दरम्यान, राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आज (७ फेब्रुवारी) मतदान पार पडणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान होत आहे. निवडणुकीच्या रिंगणात एकूण ७ हजार ४३८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. जिल्हा परिषदेच्या जागांसाठी २ हजार ६२४ तर पंचायत समितीसाठी ४ हजार ८१४ उमेदवार मैदानात उतरले आहेत. या सगळ्यांचं भवितव्य आज मतपेटीत कैद होणार आहे. आज सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच दरम्यान ही मतदान प्रक्रिया पार पडेल. निवडणूक आयोगाकडून आणि जिल्हा प्रशासनाकडून या मतदान प्रक्रियेची तयारी सध्या सुरु आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर संबंधित १२ जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदानानंतर ९ फेब्रुवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पुकारण्यात आलेल्या दुखवट्यामुळे या निवडणुका ५ फेब्रुवारीऐवजी ७ फेब्रुवारीला घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतलाय. त्या अनुषंगाने आज मतदानाची रणधुमाळी होणार आहे.

गेल्या २० दिवसांपासून सुरू असलेली परभणी जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून आज मतदान होणार आहे. जिल्हा परिषदेच्या ५४ गटांसह पंचायत समितीच्या १०८ गणांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. परभणी जिल्ह्यात एकूण १ हजार २७८ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, त्यासाठी प्रशासन सज्ज झालं आहे. जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून आज मतदान केंद्र अधिकाऱ्यांना ईव्हीएम मशीन, मतदार याद्या आणि इतर साहित्याचं वाटप करण्यात आलं. हे साहित्य घेऊन मतदान अधिकारी केंद्राकडे रवाना झाले असून, ५४ गटांसाठी २४७ तर १०८ गणांसाठी ४३३ उमेदवारांचं भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादित असलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली होती. त्यानुसार या सर्व ठिकाणी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार होते, परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्या अनुषंगाने आज मतदानाची रणधुमाळी होणार आहे.

काटेवाडीच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत मतदान केंद्रावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार, विजया पवार, नीता पवार, आशा पवार यांचे मतदान होणार आहे. याशिवाय याच मतदान केंद्रावर श्रीनिवास पवार, शर्मिला पवार युगेंद्र पवार हे देखील मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

## धाराशिवमध्ये भाजप कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील शेळगाव येथे भाजप कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. गाडी अडवून जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. पाठलाग करणारी गाडी पोलिसांनी जप्त केली आहे. ऐन निवडणूक काळात गाडीत काठ्या आणि कुराडी असल्याने एकच खळबळ उडाली आहे.

> **काँग्रेस कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा आरोप**

राजकीय वादातून काँग्रेस कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा नातेवाईकांचा आरोप आहे. चार जणांविरोधात अंबी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनाजी निवृत्ती अंचेवाढ असं गंभीर जखमी असलेल्या भाजप कार्यकर्त्याचं नाव आहे. मारहाणीत भाजप कार्यकर्त्याचा हात आणि पाय फ्रॅक्चर झाला आहे. जखमीवर बार्शी येथील खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होत आहे. या निवडणुकांच्या प्रचाराच्या तोफा कालच थंडावल्या आहेत. उद्या यासाठी मतदान प्रक्रिया पार पाडणार आहे. त्यामुळं राज्यातील अनेक ठिकाणचे राजकीय वातावरण चांगलचे तापल्याचं पाहायला मिळत आहे. राजकीय नेत्यांनी ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. यामुळं काही ठिकाणी गोंधळाची स्थिती निर्माण होताना दिसत आहे. आज धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात भाजपच्या कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. राजकीय वादातून मारहाण केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

## लाडकीय बहीण योजना; ३१ मार्चपर्यंत ई केवायसी दुरुस्ती करता येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अनेक लाभार्थी महिलांकडून पैसे मिळाले नसल्यानं राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. ई- केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं महिलांचे पैसे थकले असल्याची चर्चा होती. अखेर महिला व बाल विकास विभागानं ई-केवायसीचं पोर्टल पुन्हा सुरु केलं आहे. आजपासून या पोर्टलवरुन ई-केवायसी दुरुस्ती ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.



लाडकी बहीण ई-केवायसी पोर्टल आजपासून सुरू करण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसी पोर्टल बंद असल्याने लाडक्या बहिणींचे पैसे थांबले होते. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केले आहे. या निर्णयामुळं लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला असून आता ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी दुरुस्ती करता येणार आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी श-घधउ माध्यमातून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आधार प्रमाणीकरण करुन श-घधउ प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र ती प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबत पर्याय निवडताना चुकीचा पर्याय निवडला गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करुन लाभार्थ्यांच्या पात्रता/अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी (Physical Verification) करण्याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना शासनानं २० जानेवारी रोजी कळवलं होतं.

या लाभार्थ्याची जलदगतीने पडताळणी करण्याकरिता ऑनलाईन श-घधउ मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी योजनेच्या लाभार्थ्यांकडून व क्षेत्रिय कार्यालयाकडून होत होती. यामुळं ई केवायसी प्रक्रिया करताना चुकीचा पर्याय निवडणाऱ्या महिलांना सुधारणा करण्याची एक संधी देण्यात आली आहे. ही सुधारणा ३१ मार्च २०२६ पर्यंत करता येणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जानेवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार याकडेही पात्र महिलांचं लक्ष लागलं आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता १४ जानेवारी दरम्यान वर्ग करण्यात आला होता.

दरम्यान, महायुती सरकारच्या नेत्यांकडून विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० वरुन २१०० रुपये करण्याचे आश्वासन देण्यात आलं होतं. आता जिल्हा परिषद निवडणुकीत देखील तेच आश्वासन दिलं जातंय.

### अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विधेयकांवर चर्चा शक्य

## लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी सुरुच; कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत स्थगित; फक्त १० मिनिटे कामकाज

नवी दिल्ली : लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी आज (६ फेब्रुवारी) सुद्धा राहिली. पहिल्यांदा कामकाज फक्त तीन मिनिटे चालले आणि दुसऱ्यांदा सात मिनिटे चालले. त्यानंतर, लोकसभा ९ फेब्रुवारीपर्यंत तहकूब करण्यात आली. दरम्यान, केंद्रीय मंत्री रवनीत बिट्टू यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, काल सर्वांनी त्यांना अबोध बालक म्हटले. आज पंतप्रधानांची शाळा होती, जिथे मुलांना यशस्वी होण्यास शिकवले जाते. जर राहुल गांधीही पंतप्रधानांच्या शाळेत गेले असते तर ते आयुष्यात यशस्वी झाले असते. गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेत गोंधळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. २००४ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय लोकसभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणानंतर हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.




जेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी सुरक्षेच्या कारणास्तव पंतप्रधान मोदींना लोकसभेत भाषण न करण्यास सांगितले तेव्हा काँग्रेस खासदार माणिकम टागोर म्हणाले, आम्ही जगाचे नेते आहोत. आमचे पंतप्रधान ५६ इंचाच्या छातीचे नेते आहेत आणि ते स्वतःच्या घरातही पाकिस्तानी लोकांचा सामना करू शकतात. ते असे नाटक का करत आहेत आणि असे खोटेपणा का पसरवत आहेत? लोकसभा हे ते ठिकाण आहे जिथून ते निवडून आले. ते त्यातील एक सदस्य आहेत. ते खासदारांवर आरोप करत आहेत.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आम्ही शीख समुदायाचा आदर करतो, आमच्या सरकारमध्ये मनमोहन सिंग अर्थमंत्री होते. भाजप शीख, दलित आणि आदिवासींचा आदर करत नाही; गेल्या १० वर्षांत त्यांनी काँग्रेसला शिव्या देण्याशिवाय काहीही केलं नाही. राज्यसभेत पंतप्रधानांच्या भाषणाला उत्तर देताना खरगे यांचे हे विधान आले आहे, जेव्हा पंतप्रधान म्हणाले होते की काँग्रेस शीखांबद्दल द्वेषाने भरलेली आहे.

समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय म्हणाले, जर पंतप्रधानांनी याला मान्यता दिली असेल किंवा ते योग्य मानले असेल, तर सभागृहात बसून आपल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, ज्या आता या जगात नाहीत, त्यांच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असेल आणि नेहरूंना 'देशद्रोही' म्हटले असेल, तर ते या देशासाठी अत्यंत दुर्दैवी आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशन ६५ दिवसांत ३० बैठकांसाठी चालेल. ते २ एप्रिल रोजी संपेल. २८ जानेवारी रोजी सुरू झालेला पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपेल. त्यानंतर दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. लोकसभेत नऊ विधेयके प्रलंबित आहेत, ज्यात डेव्हलप्ड इंडिया एज्युकेशन फाउंडेशन बिल २०२५, सिक्युरिटीज मार्केट्स कोड २०२५ आणि संविधान (१२९ वी सुधारणा) बिल २०२४ यांचा समावेश आहे. ही विधेयके सध्या संसदीय स्थायी किंवा निवड समित्यांद्वारे तपासली जात आहेत.

## संपादकीय....

### प्रशासन सज्ज

राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादित असलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली होती. त्यानुसार या सर्व ठिकाणी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार होते, परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्या अनुषंगाने आज मतदानाची रणधुमाळी होणार आहे. राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आज (७ फेब्रुवारी) मतदान पार पडणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान होत आहे. निवडणुकीच्या रिंगणात एकूण ७ हजार ४३८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. जिल्हा परिषदेच्या जागांसाठी २ हजार ६२४ तर पंचायत समितीसाठी ४ हजार ८१४ उमेदवार मैदानात उतरले आहेत. या सगळ्यांचं भवितव्य आज मतपेटीत कैद होणार आहे. आज सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच दरम्यान ही मतदान प्रक्रिया पार पडेल. निवडणूक आयोगाकडून आणि जिल्हा प्रशासनाकडून या मतदान प्रक्रियेची तयारी सध्या सुरु आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर संबंधित १२ जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदानानंतर ९ फेब्रुवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पुकारण्यात आलेल्या दुखवट्यामुळे या निवडणुका ५ फेब्रुवारीऐवजी ७ फेब्रुवारीला घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतलाय. त्या अनुषंगाने आज मतदानाची रणधुमाळी होणार आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची रणधुमाळी आज रंगतेय. राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांच्या तारखेमध्ये बदल करण्यात आला होता. त्यानुसार ५ फेब्रुवार रोजी होणारे मतदान आज ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून ९ फेब्रुवारी करण्यात आलंय. या पार्श्ववभूमीवर संबंधित सर्व यंत्रणा, पोलीस प्रशासन सज्ज झालं आहे.

# गृहनिर्माणासह पायाभूत विकासात कॅनडाचे सहकार्य राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कॅनडा उत्सुक आहे.कॅनडियन इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या सहभागातून गृहनिर्माण व पायाभूत क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीद्वारे या सहकार्याची सुरुवात केली जाईल. कॅनडाच्या वित्तीय व तांत्रिक सहकार्यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत विकासाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंर्त्याच्या 'वर्षा' निवासस्थानी कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सेबास्टियन यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, मुख्यमंर्त्याचे प्रमुख आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अभिनेता अजिंक्य देव आणि अतुल गुप्ता उपस्थित होते.

कॅनडा इन्फ्रास्ट्रक्चर बँकेच्या गुंतवणुकीसंदर्भात आठ प्रमुख मुद्द्यांवर आधारित सविस्तर सादरीकरण यावेळी करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात विविध पायाभूत विकास प्रकल्प सुरू आहेत. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा लाभ घेण्यात येणार आहे. म्हाडा तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) महत्त्वाच्या उपक्रमांसाठी हे सहकार्य उपयुक्त ठरेल. प्राथमिक टप्प्यात दोन प्रकल्पांची निवड करून भागीदारीच्या दृष्टीने चर्चा केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी डॉ. सेबास्टियन यांनी महाराष्ट्रातील पायाभूत विकासासाठी कॅनडाच्या वित्तपुरवठा साखळीच्या माध्यमातून विविध तांत्रिक व आर्थिक उपाययोजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येईल, तसेच आवश्यकतेनुसार जी-२० ऑफटेकसह उच्च दर्जाची 'ट्रिपल-ए' रेटेड विश्वासार्हता प्रदान करण्यात येईल, अशी वचनबद्धता व्यक्त केली.

पायाभूत विकासासाठी गुंतवणुकीची वैशिष्ट्ये :

रुपयांमध्ये निधीचे विनियमन :

स्थानिक चलनात गुंतवणूक व यजमान देशातच निधीची पुनर्गुंतवणूक करण्याची तरतूद असून, त्यामुळे निधी परत पाठवण्याचा धोका राहणार नाही. हेजिंग किंवा स्वॅप प्रणालीची आवश्यकता भासणार नाही.

वन-स्टॉप सोल्यूशन :

सुरक्षित, एन्क्रिप्टेड वेब-आधारित व ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे कॅनडाशी संबंधित प्रकल्पांसाठी उद्योग, संसाधने, नेटवर्क आणि राज्य शासनाच्या प्रणालींशी जोडलेले सर्वसमावेशक 'वन-स्टॉप सोल्यूशन' उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

टर्न-की प्रकल्प अंमलबजावणी :

राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्धता, दीर्घकालीन परतफेडीची मुदत तसेच विमा संरक्षणाद्वारे जोखीम कमी करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

तांत्रिक सहकार्य :

प्रमुख प्रकल्प व्यवस्थापन, कार्यान्वयन व देखरेख प्रक्रियांमध्ये कॅनडाचे तांत्रिक सहकार्य लाभणार असून, स्थानिक भागीदारांच्या सहभागातून प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येतील.

# पीक पोषण शिखर परिषदेमुळे 'मेक इन इंडिया' संकल्पनेला बळ : पणनमंत्री जयकुमार रावल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'कन्वर्ज, कोलॅबोरेट अँड को-क्रिएट' ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. इंडियन मायक्रो फर्टिलायझर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या मुंबईत आयोजित परिषदेच्या माध्यमातून या संकल्पनेला अधिक बळ मिळेल, असा विश्वास पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

इंडियन मायक्रो फर्टिलायझर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयएमएमए) यांच्या वतीने मुंबई येथे सहाव्या दोन दिवसीय राष्ट्रीय पीक पोषण शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत मुख्य अतिथी म्हणून मंत्री जयकुमार रावल दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले, मायक्रो फर्टिलायझर आणि सूक्ष्म अन्नद्रव्य उद्योगाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारत आज जगाचा अन्नधान्य साठवणूक केंद्र आणि अन्न हब म्हणून ओळखला जात असून, या यशात खत उद्योगाचा मोठा वाटा आहे.

अन्न हीच आपली खरी ताकद आहे. अन्नाशिवाय जीवन शक्य नाही, त्यामुळे या सामर्थ्याचा योग्य उपयोग केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी, बियाणे उद्योग, सूक्ष्म अन्नद्रव्य उद्योग, खत उद्योग, काढणीपश्चात प्रक्रिया आणि अन्नप्रक्रिया उद्योग यांनी एकत्रितपणे काम केल्यास शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल आणि देशाची आर्थिक ताकद वाढेल, असा विश्वास मंत्री रावल यांनी व्यक्त केला.

आयएमएमए ही संस्था १९८३ पासून कार्यरत असून, गेल्या अनेक दशकात पिकांची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता वाढविण्यात तिने उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले.

जागतिक परिस्थिती सतत बदलत असताना भारताने २०४७ पर्यंत 'विकसित भारत' बनण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी संशोधन व विकासावर भर दिला आहे. या अनुषंगाने नवीन उत्पादने, नवीन सूक्ष्म अन्नद्रव्ये विकसित करून भारतीय कृषी उद्योगाला जागतिक पातळीवर नेतृत्वस्थानी नेण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन एमएसएमई क्षेत्रातील उद्योगांसोबत ठामपणे उभे असल्याचे सांगत, आपण सर्वांनी मिळून आत्मनिर्भर, सक्षम आणि जागतिक नेतृत्व करणारा भारत घडवूया, असे आवाहन मंत्री रावल यांनी केले.

# सर्वोच्च न्यायालयाने व्हॉट्सॲपला का फटकारले? नागरिकांच्या गोपनीयतेचे प्रकरण काय?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : व्हॉट्सॲप आणि त्याची मूळ कंपनी मेटा प्लॅटफॉर्म्सच्या डेटा शेअरिंग धोरणावरून सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी अत्यंत कठोर भूमिका घेतली. तुम्ही देशातील घटनात्मक मूल्यांची थट्टा करीत असून नागरिकांच्या वैयक्तिक डेटाचा गैरवापर आणि गोपनीयतेशी होणारी छेडछाड कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशी तंबीच न्यायालयाने दिली. डेटा शेअरिंग आणि गोपनीयतेशी उपस्थित झालेल्या चिंतेचे निराकरण करता येत नसल्यास आताच देशातून निघून जावे, असा थेट इशाराही न्यायालयाने दिला. यापार्श्वभूमीवर हे प्रकरण नेमके आहे तरी काय? सर्वोच्च न्यायालयाने व्हॉट्सॲपला कशामुळे खडसावले? त्याविषयीचा हा आढावा.

व्हॉट्सॲपशी संबंधित हे प्रकरण २०२१ च्या डेटा गोपनीयता धोरणाच्या संबंधित आहे. मेटाचा भाग असल्यामुळे व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांचा डेटा आणि त्यांची माहिती मेटाच्या मालकीच्या इतर कंपन्या जसे की – फेसबुक व इन्स्टाग्राम इत्यादींबरोबर शेअर करू शकते. या डेटाचा वापर वापरकर्त्यांसाठीच्या सेवा सुधारण्यासाठी केला जात असल्याचा दावा मेटाकडून करण्यात आला आहे. यादरम्यान वापरकर्त्यांचा खासगी डेटा व चॅट्स कोणीही पाहू शकत नाही, असा दावाही मध्यंतरी व्हॉट्सॲपकडून करण्यात आला होता. मार्च २०२१ मध्ये भारतीय स्पर्धा आयोगाने गोपनीयता धोरणाची पहिल्यांदा चौकशी सुरू केली. त्यानंतर व्हॉट्सॲप आणि त्याची मूळ कंपनी मेटाला २१३.१४ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्याविरोधात दोन्ही कंपन्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

सरन्यायाधीशांनी मेटाला सुनावले खडेबोल

मंगळवारी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी झाली. या खंडपीठात न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांचाही समावेश होता. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी मेटाला चांगलेच खडेबोल सुनावले. आम्ही तुम्हाला वापरकर्त्यांची साधी एक माहितीदेखील शेअर करू देणार नाही. तुम्ही या देशातील नागरिकांच्या अधिकारांशी खेळू शकत नाही. तुमच्या व्हॉट्सॲपवर हा संदेश स्पष्टपणे जाऊ द्या. भारतातील नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण हे सर्वोच्च प्राधान्य असून कोणत्याही बहुराष्ट्रीय कंपनीला त्यात हस्तक्षेप करण्याची मुभा दिली जाणार नाही, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी यावेळी स्पष्ट केले.

याचिका फेटाळण्याचा दिला इशारा – वापरकर्त्यांच्या गोपनीयतेसंदर्भात जर तुम्ही प्रतिज्ञापत्र सादर करत असाल तर ठीक, अन्यथा तुमची याचिका आताच फेटाळून लावली जाईल. नागरिकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराशी तुम्ही असा खेळ कसा करू शकता? असा संतापही सरन्यायाधीशांनी व्यक्त केला. मेटा आणि व्हॉट्सॲपच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि अखिल सिबल यांनी न्यायालयात बाजू मांडली. स्पर्धा आयोगाने ठोठावलेला २१३.१४ कोटी रुपयांचा दंड जमा करण्यात आल्याचे त्यांनी खंडपीठाला सांगितले. यादरम्यान ही रक्कम पुढील आदेशापर्यंत काढली जाऊ नये, असे निर्देश खंडपीठाने दिले. डेटा शेअरिंग धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने सुरुवातीला व्हॉट्सॲपला नागरिकांच्या गोपनीयतेची माहिती शेअर न करण्याचे निर्देश दिले. मात्र, मुकुल रोहतगी यांनी शेअरिंगला परवानगी दिल्याचे सांगितल्यानंतर न्यायालयाने मेटाला आपली भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले.


सरन्यायाधीश सूर्यकांत काय म्हणाले?

अंतिम निर्णय होईपर्यंत डेटा शेअर केला जाणार नाही, अशी हमी कंपन्यांनी न दिल्यास न्यायालय स्वत:हून तसा आदेश जारी करेल, असा इशाराही खंडपीठाने यावेळी दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत सांगितले की– कंपनीने मक्तेदारी निर्माण केल्यामुळे आज नागरिकांना व्हॉट्सॲपवर अवलंबून राहावे लागत आहे. व्हॉट्सॲपला मेटाने विकत घेतले आहे. उद्या ते दुसऱ्या कुणालाही कंपनी विकतील आणि नागरिकांचा डेटाही हस्तांतरित करतील, अशी चिंता सरन्यायाधीशांनी व्यक्त केली. त्यावर मेटा-व्हॉट्सॲपची बाजू मांडणारे वकील अखिल सिब्बल यांनी दावा केला की– डेटा शेअरिंग वापरकर्त्यांच्या संमतीने होते आणि त्यांना माहिती नाकारण्याचा पर्याय उपलब्ध आहे. त्यांच्या या उत्तरावर सरन्यायाधीशांनी माहिती नाकारण्याचा पर्याय म्हणजे काय? तुम्ही देशातूनच बाहेर पडा आणि तुमच्या सुविधा इथून बंद करा, असा संताप व्यक्त केला.

व्हॉट्सॲपला खरंच भारताबाहेर पडू शकते का?

नागरिकांच्या गोपनीयतेशी उपस्थित झालेल्या चिंतेचे निराकरण करता येत नसल्यास आताच देशातून निघून जावे, असा थेट इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला असला तरी– ही व्हॉट्सॲपला एका झटक्यात भारतातून बाहेर पडणे कठीण आहे. त्यामागचे कारण म्हणजे– देशभरात व्हॉट्सॲपचे सुमारे ८५ कोटी वापरकर्ते आहेत. देशातील १.५ कोटींहून अधिक लहान–मोठे व्यावसायिक आपल्या ग्राहकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापर करतात. आकडेवारीनुसार, २०२६ च्या अखेरीस व्हॉट्सॲपची भारतातील कमाई २७ हजार कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे. याआधी २०२५ मध्ये व्हॉट्सॲपची देशातील कमाई सुमारे २३ हजार कोटी रुपये इतकी होती. यादरम्यान नागरिकांच्या गोपनीयतेसाठी सर्वोच्च न्यायालयाने व्हॉट्सॲप आणि त्याची पालक कंपनी मेटाला एक प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहे. पुढील सुनावणीत न्यायालय कंपन्यांना त्यांचे गोपीनीयता धोरण सुधारण्याचा आदेश देण्याची शक्यता आहे.

# शेतकरी व पशुपालकांना केंद्रस्थानी ठेवून 'महापशुधन एक्स्पो'ची तयारी करा : पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रस्थानी ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महा-पशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पशुपालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीविषयक तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी महापशुधन एक्स्पो महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत. या प्रदर्शनात जैविक शेती, पशुधनापासून होणारे लाभ याविषयी माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत.

पशुप्रदर्शनात १५०० पशू प्रदर्शित करण्यात येणार आहेत. त्याशिवाय राज्य शासनाच्या कृषी, महिला व बालविकास यासह विविध विभागांचे माहितीपर स्टॉल असणार आहेत. तसेच बचतगटांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शनास भेट देणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने या सर्वांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रदर्शनाचा परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात यावा. महिलांसाठी वेगळा कक्ष उभारून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता उपलब्ध असावी. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुंच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्याशिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णावाहिका, अग्निशमन यंत्रणा, पोलिस संरक्षण, स्वयंसेवक यांचीही नियुक्त करण्यात यावी, असे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

या प्रदर्शनात विविध जातींच्या पशूंचा समावेश असणार आहेत. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था, डॉग शोसह विविध प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे योग्य मूल्यांकन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यातील पशुंशिवाय परराज्यातील गुणवंत व दर्जेदार पशुपक्षी यांचेही प्रदर्शन होईल. याचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रदर्शनाच्या ठिकाणी रक्तदान शिबिर, अवयवदान संमती पत्र आदी सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

महिला व विद्यार्थ्यांना पशुप्रदर्शन पाहण्यासाठी दुपारच्या वेळी विशेष वेळ ठेवण्यात यावा. तसेच राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांनाही निमंत्रित करण्यात यावे. राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रदर्शनास राज्यातील शेतकरी, पशुपालक, पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी यांनीही उपस्थित राहावे, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी केले.

पशुसंवर्धन आयुक्त देवरे यांनी प्रदर्शनाच्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनास येणाऱ्यांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून पशुधन घेऊन येणाऱ्या वाहनांसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता असणार आहे. त्याशिवाय पारितोषिक पात्र पशुधनांचे विशेष प्रदर्शन या ठिकाणी असणार आहे. तीन वेगवेगळ्या पेंडॉलमध्ये सुमारे ३०० स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रदर्शनात पशुपालकांसमवेतच या क्षेत्रातील उद्योजकही सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनीही प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनात येणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात वीस एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आदींची तयारी करण्यात आली आहे. स्वयंसेवक म्हणून 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. प्रदर्शनात महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पोलीसांचे हेल्प डेस्क उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक : मतदानासाठी पथके मतदान साहित्यांसह रवाना







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी शनिवार दि.०७ फेब्रुवारी २०२६ रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार असून, मतदारांना सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदानाचा हक्क बजावता येईल. तालुक्यात या मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मशीन व मतदानासाठी लागणारे आवश्यक साहित्य, साधनसामुग्रीचे वितरण मतदान चमूंना आज वितरीत करण्यात आले असून मतदान पथके मतदानस्थळी रवाना झाली आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

मतदान पथके शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथून मतदान केंद्रावर रवाना करण्यात आले असून मतदान पथकांचे परिवहन व्यवस्थेकरीता ४२ एस.टी. बसेस, ०५ जीप तसेच क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी ३२ वाहने वापरण्यात येणार आहेत. मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिस प्रशासनामार्फत आवश्यक प्रमाणात पोलीस बल तैनात ठेवण्यात आले आहे.

मतदान केंद्रातील आवश्यक सुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन तत्पर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया निर्भय, नि:ष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. तालुक्यातील सर्व मतदारांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान प्रक्रियेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असेही आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्री इथापे यांनी केले आहे

# वत्सलामाई गायकवाड आदर्श माता पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने वत्सलामाई बळीराम गायकवाड आदर्श माता पुरस्कार वितरण सोहळा, बेघर निवारा केंद्रात संपन्न झाला.

याविषयी सविस्तर वृत्त असे की,मा खा सुनिल गायकवाड साहेब यांच्या मातोश्री वत्सलामाई बळीराम गायकवाड यांच्या ८५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने ज्या मातांनी आपल्या मुलांना मुलींना अत्यंत हालाकीच्या परिस्थितीत उच्च शिक्षण देऊन वकील डॉक्टर इंजिनिअर शिक्षक ग्रामसेवक तलाठी इत्यादी पदावर जाण्यायोग्य बनविले आशा आदर्श मातांचा सन्मानचिन्ह,व सन्मानपत्र देऊन शाल मानाचा फेटा बांधून सन्मान व गुणगौरव करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा.खा. डॉ.प्रा.अॅड.सुनिल बळीराम गायकवाड, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी (फौजदार) व्यंकट कव्हाळे, प्रा.इंदूताई बटनपुरकर, प्रदेशाध्यक्षा सुरेखाताई पाटील, प्रियंका विश्वजीत गायकवाड, उषाताई धावारे, छाया कळसे, दिपमाला तुपकर, सुशिल चिकटे, चंद्रकांत वायाळ, सुफी सय्यद शमशोद्दीन, सुरज मांदळे, दयानंद बटनपुरकर, वैशाली रोकडे,राणी लोढा (माळी), महादेव आडसुळ, सुभाष घोडके,प्रा अविनाश घोडके, सारंग वाघमारे, प्रा.बळीराम पवार, अर्जुन वाघमारे, सुमेधा सुर्यवंशी, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. यात आदर्श माता पुरस्काराचे मानकरी, हभप सुनिता ताई आडसुळ, आशाताई चिकटे, ताहेरा सिकंदर, रंजना घोडके, ज्योती धारगावकर, सुकुमार भिसे, पार्वती पानखडे, रागिणी आल्टे, गंगासागर ढवळे, प्रभावती दिक्षीत, यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन झाले यात मा.खा.सुनिल गायकवाड म्हणाले, आधुनिक श्रावणबाळ व पौराणिक श्रावणबाळ यात तफावत असुन, आई वडील यांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या श्रावणबाळांची संख्या झपाट्याने वाढत असुन ही मानवजातीच्या भविष्यातील चिंताजनक बाब आहे.

# नंगपुरामुर्री येथील शासकीय निवासी शाळेची खोखो चमू राज्यतरावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग समाज कल्याण, सहायक आयुक्त गोंदिया अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थी यांनी वयोगट १७ खो-खो चमू राज्यतरावर खेळायला जाऊन आपले उत्कृष्ट प्रदर्शन राज्यस्तरावर केले. यावेळी नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व केले असून सदर चमुचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### समाज कल्याण विभाग : राज्यस्तरीय कला व क्रीडा अविष्कार संप'अ'

सदर विभागाचे जिल्हा व विभाग स्तरावर कला व क्रीडा अविष्कार दि. ५ व ६ फेब्रुवारी संपन्न झाले असून त्यामध्ये जबरदस्त खोखो सांघिक खेळाचे प्रदर्शन केले होते. त्यानुषंगाने सदर चमू शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनाखाली अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा दिवे ता. पुरंदर जि. पुणे याठिकाणी खेळण्यासाठी संचित शहारे, आदित्य जमदाळ, आर्यन सोनवणे, आदित्य कोकोडे, धृप लटये यांचा सहभाग होऊन खेळले.



यासंदर्भात खेळायला जाण्यासाठी सहाय्यक आयुक्त किशोर भोयर, स्वाती कापसे, शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर ईठूले, नीता भलमे, प्रदीप ढवळे, पी ए लांजेवार, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदींनी अभिनंदन केले.

नागपूर विभागाचे केले प्रतिनिधित्व जिल्हा कला व क्रीडा अविष्कार संपन्न झाल्यानंतर विभागावर खो खो खेळाचे प्रदर्शन करुन राज्यस्तरावर नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व केले आहे.

# जेईई (मेन) २०२६ सेशन- २ च्या परीक्षेचे ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये डिग्री इंजिनिअरींगला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व भारत सरकारच्या उच्चतर शिक्षण विभाग, मंत्रालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'जेईई (मेन) २०२६ सेशन- २' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. रविवार, दि.०१ फेब्रुवारी २०२६ पासून ते बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार असून ही परीक्षा गुरुवार, दि.०२ एप्रिल २०२६ ते गुरुवार, दि. ०९ एप्रिल २०२६ दरम्यान होणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

प्रथम वर्ष इंजिनिअरींगच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'जेईई (मेन) २०२६ च्या सेशन- २' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत रविवार, दि.०१ फेब्रुवारी २०२६ पासून ते बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दिली आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फॉर्म फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. जेईई (मेन) फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करिता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रा. उत्तम अनुसे (मोबा.-९१६८६५५३६५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

### दि. २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार प्रक्रिया

**९९ हेक्टर जमीन अधिग्रहणाला तीव्र विरोध; 'विश्वासात न घेता घेतलेला निर्णय अन्यायकारक' शेतकऱ्यांची खंत**

# भादाणेचा भूस्फोट ! एमआयडीसी नोटीसीनंतर शेतकरी आक्रमक; रस्त्यावरची लढाई अटळ?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा नजिकच्या भादाणे, आतकोली आणि वाशेरे गावांतील सुमारे ९९ हेक्टर जमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहित करण्याच्या शासन निर्णयामुळे परिसरात तीव्र असंतोष पसरला आहे. ग्रामीण भागात गोदाम व्यवसायामुळे जमिनी सोन्याच्या किमतीच्या झाल्या असताना, कोणतीही पूर्वसूचना किंवा स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करीत बाधित शेतकऱ्यांनी थेट भिवंडी येथे उपविभागीय अधिकारी अमित सानप यांची भेट घेऊन निवेदन सादर केले व भूसंपादनास तीव्र विरोध दर्शविला. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खाणीकर्म विभागाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजी एमआयडीसीसाठी जमीन अधिग्रहणाचा शासन निर्णय काढला. त्यानंतर १४ जानेवारी रोजी भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून शेतकऱ्यांना नोटीसी बजावण्यात आल्याने बाधित शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली. यापूर्वी मनमाड-मुंबई पेट्रोल लाईन, रिलायन्स गॅस लाईन, वीज उपकेंद्र, टाटा पॉवर लाईन अशा विविध प्रकल्पांसाठी जमिनी गेल्या असून, त्याबदल्यात योग्य व समाधानकारक मोबदला मिळाला नसल्याचा आरोप शेतकरी प्रकाश भोईर यांनी केला.

शेती हेच आमचे एकमेव उपजीविकेचे साधन आहे. या भूसंपादनामुळे आम्ही पूर्णपणे उध्वस्त होऊ, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शासनाने जमीन अधिग्रहित करायचीच असल्यास किमान दहा ते बारा लाख रुपये प्रति गुंठा मोबदला द्यावा, अन्यथा न्यायालयीन लढाईसह रस्त्यावर उतरून संघर्ष छेडला जाईल, असा इशारा अॅड. संदीप जाधव यांनी दिला. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, नोटीसी देण्यापूर्वी संवाद हवा, अशी ठाम भूमिका रमेश शेलार यांनी मांडली. यावेळी प्रकाश भोईर, चंदू जाधव, अॅड. संदीप जाधव, रमेश शेलार, गुरुनाथ भोईर, प्रदीप भोईर, संतोष राऊत, रवींद्र पाटोळे आदी शेतकरी उपस्थित होते. जिल्हाधिकारी ठाणे यांनी भूसंपादन प्रक्रियेसाठी भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयाची सक्षम प्राधिकरण म्हणून नेमणूक केली असून, एमआयडीसी भूसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया सुरू आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या हरकती शासन स्तरावर पुढील कारवाईसाठी पाठविण्यात येतील, अशी माहिती उपविभागीय अधिकारी अमित सानप यांनी दिली आहे. पण शेतकऱ्यांचा संताप शमेल की संघर्ष अधिक तीव्र होणार? हेच आता पाहावे लागणार आहे.

# बार्टीच्यावतीने वनंद येथे रमाई जयंतीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने त्यागमूर्ती रमामाई भीमराव आंबेडकर यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त त्यांचे जन्मस्थळ वनंद ता दापोली जिल्हा रत्नागिरी येथे दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध प्रबोधनात्मक व अभिवादन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली वनंद तसेच पुणे येथिल महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक , तसेच बार्टी मुख्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

वनंद येथे बार्टी संस्थेच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांवरील मौल्यवान ग्रंथ सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या बुक स्टॉलचे उद्घाटन बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भीमशाहिर शहिद खेरटकर निर्मित क्रांतीचे पाऊले तसेच

मी रमाई बोलतोय

हे एकपात्री नाटक कु. प्रेरणा खरात लिंगेकर या सादर करतील.

बार्टीच्यावतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहान विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील परिवार देवतांच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तिभावात संपन्न








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसरातील परिवार देवता मंदिरांचे जतन व संवर्धन काम पुरातत्व विभागामार्फत शासन निधीतून सुरू आहे. या अंतर्गत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील एकूण ३६ परिवार देवतांपैकी काही मंदिरांचे जतन व संवर्धन कार्य पूर्णत्वास आले असून, त्यातील १० मंदिरांमधील परिवार देवतांच्या मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा शुक्रवार, दिनांक ६ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली.





दक्षिणमुखी गणपती मंदिर, गरुड हनुमंत, श्री रामेश्वर मंदिरावरील शाळुंखा या परिवार देवतांच्या मूर्ती नव्याने विधिवत यज्ञ करून स्थापित करण्यात आल्या. तसेच महा नैवेद्य दरवाज्याशेजारील शाकंबरी, काशीविश्वेश्वर शेजारील गणपती, काशी विश्वेश्वर, काशी विश्वेश्वर समोरील नंदी, रामेश्वर, रामेश्वर समोरील नंदी, लक्ष चौऱ्याऐंशी देवी आदी परिवार देवतांच्या मूर्तींची पुनः प्राणप्रतिष्ठा शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात आली.

हा प्राणप्रतिष्ठा सोहळा दिनांक ४ ते ६ फेब्रुवारी या कालावधीत श्री विठ्ठल सभा मंडप येथे २१ ब्रह्मवृंदा मार्फत पार पडला. यावेळी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व प्रसाद दशपुत्रे उपस्थित होते.

या दहा परिवार देवता मंदिरांचे जतन व संवर्धन कार्य पूर्णत्वास आल्याने संबंधित मंदिरांतील मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून, ही मंदिरे आता भाविकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर अंतर्गत शासनामार्फत मंदिराच्या मुख्य वास्तूंसह मंदिर परिसरातील व बाहेरील परिवार देवता भागातील विविध ठिकाणांचे जतन, दुरुस्ती व संवर्धन कार्य टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात आले आहे. यापैकी काही ठिकाणची कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. जतन व संवर्धन कार्य पूर्ण झालेल्या ठिकाणी स्थापत्य व धार्मिक परंपरेनुसार मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठापना करणे आवश्यक असते. धार्मिक शास्त्र, प्रचलित रीतिरिवाज व परंपरांनुसार प्राणप्रतिष्ठा झाल्याशिवाय मूर्तींच्या पूजनास प्रारंभ करता येत नाही. त्या अनुषंगाने दिनांक ४ ते ६ फेब्रुवारी या तीन दिवसांच्या कालावधीत सर्व संबंधित मूर्तींची प्राणप्रतिष्ठा शास्त्रोक्त पद्धतीने, विधिवत पूजा, अभिषेक, होम-हवन, मंत्रोच्चार व इतर धार्मिक विधींसह भक्तिभावात संपन्न करण्यात आली.



## राज्य लॉटरीच्या जानेवारी महिन्यातील भव्यतम, मासिक व साप्ताहिक सोडतीचा निकाल जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात ५ मासिक व ६ भव्यतम सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात. जानेवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र नाताळ नवीन भव्यतम सोडत, महाराष्ट्र सहयाद्री, महाराष्ट्र गणेश लक्ष्मी मकर संक्रांत विशेष, महाराष्ट्र गौरव, महाराष्ट्र तेजस्विनी व महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्याचे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे. दि. ७ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम या सोडतीमधून ञ-०५२८८४ या महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर व ञ-०७४०८० या श्री. सिद्धी समर्थ एजन्सी, दादर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे दोन बक्षिस जाहीर झाली आहेत. दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र गौरव या मासिक सोडतीमधून उ-१८०८७९ या डायमंड कॉपोरेशन, बोरिवली यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२७ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहीर झाले आहे. दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी या मासिक सोडतीमधून ऊ-०३९६६१ या रॉयल एजन्सी, आंकली यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.२१ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस दुसरे बक्षिस रू. २ लाखाचे जैनी एजन्सी, घाटकोपर यांचेकडून जाहीर झाले आहे. तसेच महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रक्कम रू. ७ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एकूण ५ बक्षिसे जाहीर झाली आहेत. याशिवाय जानेवारी-२०२६ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून १२८८२ तिकीटांना रू. १,५६,६७,२००- व साप्ताहिक सोडतीतून ५५,५४३- तिकीटांना रू १,५८,५९,१००- ची बक्षिसे जाहीर झाली आहेत. सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम रू. १०,०००- वरील बक्षिसाची मागणी उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. १००००- च्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी, वाशी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## आता जमिनीच्या मोजणीनंतरच दस्त नोंदणी; कायद्यात अनेक सुधारणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : प्रत्येकालाच वाटते त्याच्याकडे जमीन असावी. काहींना शेतीसाठी जमीन हवी असते तर काहींना घर बांधण्यासाठी. सध्याच्या काळात काही ठिकाणी जमिनीचे भाव गगणाला भिडले आहे.जमीन घेणे सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर झाले आहे. आयुष्यभर मेहनत करून गोळा झालेल्या पैशातून घेतलेली जमीन वाद निर्माण झाल्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे जमिनीशी संबंधित कायद्यात शासनाकडून अनेक सुधारणा करण्यात येत आहे.

पाणंद रस्त्यातील अतिक्रमण तात्काळ काढण्यासाठी शासनाने कायदा केला आहे. तर अनेक जुने कायदे रद्द केले आहे. जमीन आणि दस्त नोंदणी संदर्भातही काही नवीन सुधारण करण्याची तयारी शासनाची आहे.

जमिनीच्या मुद्यावरून अनेकदा वाद निर्माण होतात. यातून हिंसक प्रकार सुद्धा घडले आहेत. जमिनीची मोजणी न करताच दस्त नोंदणी केली जात असल्याने अनेकदा वाद होतात. त्याला आळा घालण्याचा प्रयत्न शासनाचा आहे. त्यासाठी प्रथम जमिनीची मोजणी झाल्यानंतरच दस्त नोंदणी होईल आणि त्यानंतर फेरफार होईल, तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. अनेकदा कौटुंबिक वादासाठी किंवा इतरांसोबत होणाऱ्या वादांच्या कारणांमध्ये जमीन हे सुद्धा एक प्रमुख कारण असते. दस्त नोंदणीच्या वेळी नमूद क्षेत्रफळाच्या मुद्यावरून काही वेळा वाद निर्माण होतो.



खरेदीदाराला प्राप्त क्षेत्रफळानुसार जमीन मिळावी आणि त्या आधारेच त्याच्याकडून मुद्रांक शुल्काची आकारणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे आता जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार करताना प्रथम जमिनीची मोजणी करण्यात येईल व त्यानंतरच दस्त नोंदणी होईल. क्षेत्रफळ निश्चित झाल्यावरच बाजारमूल्य निश्चित करून त्यावर मुद्रांक शुल्काची आकारणी होईल. ही प्रक्रिया पार पडल्यावर फेरफाची कारवाई होईल. असा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. लवकरच त्यावर निर्णय होणार असल्याची माहिती महसूल विभागातील सूत्रांनी दिली.

नियमात अडकली खासगी भूमापकांची नियुक्ती

जमिनीच्या मोजणीला होत असलेल्या विलंबामुळे होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन व या क्षेत्रातील गैरव्यवहार थांबवण्यासाठी ३० दिवसात मोजणीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला. हे भूमापक परवानाधारक असतील. यासाठी शासनाकडून नियमावली तयार करण्यात येणार आहे. ही नियमावली अद्याप तयार झाली नाही. त्यामुळे या खासगी भूमापकांची नियुक्ती अडकल्याचे सूत्रांनी सांगितले.

**केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती**

# अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत १७२ स्थानकांचे काम पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : स्थानकांचा पुनर्विकास दीर्घकालीन दृष्टिकोनासह स्थानकांचा पुनर्विकास करण्यासाठी, रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत स्थानक योजना सुरू केली आहे. या योजनेत स्थानके सुधारण्यासाठी बृहत आराखडा तयार करणे आणि टप्प्याटप्प्याने त्यांची अंमलबजावणी करणे समाविष्ट आहे. बृहत आराखडामध्ये समाविष्ट बाबी पुढीलप्रमाणे :

- स्थानक आणि त्याच्या परिचालन क्षेत्रातील प्रवेश सुलभ बनवणे
- स्थानकाला शहराच्या दोन्ही बाजूंनी जोडणे
- स्थानक इमारतीत सुधारणा
- प्रतीक्षालय, शौचालये, बसण्याची व्यवस्था, पेयजल व्यवस्था सुधारणे
- दिव्यांगजनांसाठी सुविधा
- उत्तम प्रवासी सूचना प्रणाली
- प्रत्येक स्थानकावर आवश्यकतेनुसार एक्झिक्युटिव्ह लाउंज, व्यवसाय संबंधित बैठकांसाठी निर्धारित जागा, लँडस्केपिंग इत्यादींची तरतूद

या योजनेअंतर्गत आतापर्यंत १३३७ स्थानके विकासासाठी निवडण्यात आली आहेत. तर १७२ स्थानकांची कामे आतापर्यंत पूर्ण झाली आहेत.




**पुलांची सुरक्षा**

सर्व पुलांची वर्षातून दोनदा नियुक्त अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाते, एकदा पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि एकदा पावसाळ्यानंतर सखोल तपासणी केली जाते . याव्यतिरिक्त, मुख्य पूल अभियंता यांनी ठरवल्यानुसार काही पुलांची त्यांच्या स्थितीनुसार वरचेवर तपासणी केली जाते. महत्त्वाच्या आणि प्रमुख पुलांची व्यापक तांत्रिक तपासणी अशा प्रकारे केली जाते ज्यात अशा पुलांपैकी २०म पुलांची वार्षिक तपासणी केली जाते.

पुलांची दुरुस्तीमजबुतीकरणपुनर्वसनपुनर्बांधणी ही एक निरंतर आणि चालू राहणारी प्रक्रिया आहे आणि ती पुलांच्या तपासणीच्या आधारे केली जाते. वर्ष २०२२-२०२५ दरम्यान (डिसेंबर २०२५ पर्यंत), भारतीय रेल्वेमध्ये ८,६२६ रेल्वे पुलांची दुरुस्तीपुनर्वसनमजबुतीकरणपुनर्बांधणी करण्यात आली आहे.

**रेल्वेच्या डब्यांची (कोच) निर्मिती**

सध्या, रेल्वे मंत्रालयाअंतर्गत देशात रेल्वेगाडीचे डबे तयार करणारे तीन कारखाने कार्यरत आहेत. या कारखान्यांच्या विकासाचा खर्च, स्थान, डब्यांचा प्रकार , नियोजित उत्पादन क्षमता आणि स्थापित करावयाची यंत्रसामग्री आणि संयंत्र यासारख्या घटकांवर अवलंबून असतो.

शिवाय, इंटिग्रल कोच फॅक्टरी चेन्नई, रेल कोच फॅक्टरी कपूरथला आणि मॉडर्न कोच फॅक्टरी रायबरेली या तीन कार्यरत कारखान्यांच्या अपग्रेडेशनविस्ताराशी संबंधित विविध प्रकल्पांसाठी २४४३ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

**रेल्वे स्थानकांवरील स्टॉल्स**

प्रवास करत असलेल्या प्रवाशांना पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, रेल्वे स्थानकांवरील दुकानांचे (स्टॉल्स) वितरण, प्रचलित धोरणानुसार ई-लिलाव किंवा ई-निविदा प्रक्रियेद्वारे केले जाते.

सध्या रेल्वे स्थानकांवर ११६५० दुकानेयुनिट्स कार्यरत आहेत. त्यांचे वाटप अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती समुदायातील अर्जदारांसह सर्व पात्र अर्जदारांना करण्यात आले आहे. रेल्वे स्थानकांवर विनामूल्य दुकाने वाटप करण्याची कोणतीही तरतूद सध्याच्या धोरणात उपलब्ध नाही.

**स्वच्छता**

स्वच्छता ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया असून भारतीय रेल्वेच्या वतीने रेल्वेगाड्यांच्या डब्यांची योग्य देखभाल आणि ते स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छतागृहांसह रेल्वे डब्यांमध्ये स्वच्छता आणि आरोग्य यासंदर्भात देखरेखीसाठी रेल्वेने विविध उपाययोजना केल्या आहेत:

डब्यांचे अंतर्गत भाग, बाह्य भाग आणि स्वच्छतागृहांच्या उत्तम स्वच्छतेसाठी प्राथमिक देखभालीदरम्यान डब्यांच्या स्वच्छतेसाठीची यांत्रिकीकृत प्रक्रिया राबवली जाईल याची सुनिश्चिती केली गेली आहे.

रेल्वे प्रवासात असताना स्वच्छता राखण्यासाठी आणि प्रवाशांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्यक्ष त्या गाडीतच स्वच्छता कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध करून दिली जाते.

ठराविक रेल्वे गाड्यांच्या प्रवासादरम्यान, त्यांच्या नियोजित थांब्यांवर स्वच्छतागृहांसह डब्यांची यांत्रिकीकृत स्वच्छता करण्याच्या उद्देशाने, स्वच्छता रेल्वे स्थानक सेवा सुरू करण्यात आली आहे. या स्थानकांवर, उच्च दाबाच्या जेट मशिन आणि स्वच्छता उपकरणांनी सज्ज असलेले कर्मचाऱ्यांचे समर्पित पथक, डब्यातील स्वच्छतागृहांची स्वच्छता आणि त्यानंतर ती कोरडी करण्याचे काम करते.

सर्व प्रवासी डब्यांमध्ये जैव शौचालयं बसवण्यात आली आहेत, यामुळे डब्यातून मानवी विष्ठा रेल्वे रुळांवर पडणार नाही याची सुनिश्चिती झाली आहे, तसेच स्वच्छतेचा दर्जा सुधारला आहे.

**जैव शौचालयासाठीच्या सविस्तर तरतुदी खाली दिल्या आहेत :**

अन्न आणि खाद्य पुरवठा

प्रवाशांचा अभिप्राय घेण्यासाठी, गेल्या काही वर्षात रेलमदद पोर्टल सुरू केले असून, त्या माध्यमातून भारतीय रेल्वेची तक्रार व्यवस्थापन प्रणाली अधिक बळकट, सोपी आणि सुलभ करण्यात आली आहे. रेलमदद पोर्टलच्या माध्यमातून भारतीय रेल्वेने प्रवाशांना तक्रारी आणि सूचना नोंदवण्यासाठी एकल खिडकी व्यवस्थेची सोय उपलब्ध करून दिली आहे. रेल्वेमधील खाद्य पुरवठा मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ आणि रेल्वेचे अधिकारी नियमित तसेच अचानकही तपासणी करत असतात. केंद्रीय रेल्वे, माहिती आणि प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती दिली.